नि.फौ.ख.–३२५/२०२१
नि.क्र. ३४

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सतिष विष्णु म्हसे
वय – ३८ वर्षे,
व्यवसाय – शेती
राहणार – रा. शिलेगाव, ता. राहुरी जि.अ.नगर

**<u>सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्री.आर.के.गागरे</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. आरोपी हे आमचे शेजारी राहतात. घटना ही सन २०२१ मध्ये आमच्या शेतामध्ये घडली. घटनेच्या वेळी आरोपीसोबत माझी किरकोळ बाचाबाची झाली होती. त्यामुळे मी आरोपीविरूद्ध फिर्याद दिली होती. असे काही घडले नाही की, दि. २१/०२/२०२१ रोजी सायं. ०५.०० च्या सुमारास मी शेतामध्ये कांद्याला पाणी घालत असताना, आरोपीने त्यांच्या शेतातील उसाचे पाचट पेटवल्यामुळे माझ्या शेतातील गहू जळाला होता. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीला ओळखीपूरती **नि.३५** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षाच्या बाजूने साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २१/०२/२०२१ रोजी सायं. ०५.०० च्या सुमारास मी शेतात कांद्याला पाणी देत असताना आरोपीने त्यांच्या शेतातील ऊसाचे पाचट पेटवल्यामुळे माझ्या शेतातील गहू जळाला होता. त्याचा जाब विचारण्यासाठी गेलो असता आरोपीने मला शिवीगाळ करून जिवेठार मारण्याची धमकी दिली. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखांकित 'भाग अ' वाचून दाखवण्यात आला. तो मी पोलीसांना सांगितला नव्हता पोलीसांनी का लिहून घेतला याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आमच्या गावातील रहिवासी असल्यामुळे आमच्यात तडजोड झाली असून सदर पुरसीस (**नि.क्र.३३**) मी न्यायालयात दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत तडजोड झाल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधीज्ञ आर. एम. शेटे यांच्यातर्फे</u>**

**<u>आरोपींनी उलटतपास नाकारला.</u>**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.03.10 10:48:33 +0530

राहुरी
दिनांक – १७/०२/२०२६.

**(श्री. पी. एच. पाटील)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२,राहुरी

नि.फौ.ख.–३२५/२०२१
नि.क्र. ३४